## विशेष दरखास्त ३९/२०१५ मधील नि.९४ वरील आदेश
## (रामचंद्र तपासे मयत तर्फे वारस वि. शेवंताबाई तपासे व इतर)
**(CNR No-MHST05-000409-2015)**

प्रस्तुतची दरखास्त स्पे.दि.मु.नं. ४४९/२००० मधील हुकूमनाम्याप्रमाणे शेत मिळकतींचे व घर मिळकतींचे वाटप होवून मिळणेकरीता दाखल केली आहे.

०२. सदर प्रकरणात दहा घरमिळकती आहेत. त्यापैकी सि.स.नं.२९२/फ याचे क्षेत्र १९०.६ चौ.मी. व त्यातील खुली जागा व इमारतीसह या मिळकतीबाबत ति–हाईत इसम यांनी हरकत नोंदवली आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे, सदर मिळकतीमध्ये ति–हाईत इसम यांचा ४/५ हिस्सा आहे. ति–हाईत इसम यांचे क्षेत्र वगळून वाटप होणे आवश्यक आहे. दरखास्तदार व जे.डी.नं.३,४ व ५ यांना ति–हाईत इसम यांचा वर नमूद मिळकतीत ४/५ हिस्सा असल्याचे मान्य आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करुन जे.डी.नं.३,४ व ५ यांनी विनंती केली आहे की, सि.स.नं.२९२/फ ही मिळकत वगळून इतर मिळकतींचे वाटप करण्यात यावे.

०३. सदर अर्जास दरखास्तदार यांची मान्यता आहे. परंतु जे.डी.नं.२ यांनी हरकत घेतलेली आहे. एकूण दहा घर मिळकतींकरीता दरखास्त दाखल केलेली आहे. हुकूमनाम्याप्रमाणे सर्व घर मिळकतींचे एका वेळी वाटप होणे आवश्यक आहे. वाटपाचे वेळी एखादया घर मिळकतीचे वाटप कमी क्षेत्रामुळे होवू शकत नाही असा निष्कर्ष निघल्यास त्या घर मिळकती ऐवजी इतर जास्त असलेल्या क्षेत्रामध्ये दरखास्तदार व जे.डी.यांना

त्यांचा हिस्सा वाढवून देता येवू शकतो. एक घर मिळकत वगळून वाटप केल्यास दरखास्तीचे काम प्रलंबित राहणार असून पुढील कारवाईकरीता अडचणी निर्माण होणार आहेत. कायद्यानुसार वाटपाचे वेळी आलेल्या हरकतीचे निरसन करुनच पुढील वाटपाचे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामी ति–हाईत इसम म्हणतात त्याप्रमाणे त्यांचा सि.स.नं.२९२/फ या मिळकतीत ४/५ हिस्सा आहे किंवा कसे हे निश्चित करणे आवश्यक आहे. ते निश्चित झाल्यानंतरच घर मिळकतींचे वाटप होणे कायद्याप्रमाणे सोयीस्कर होईल. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करता येणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.09.12 17:14:29 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – १२/०९/२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड